ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २३ एप्रिल, १९५२ अंक १७

## विविध माहिती

**मीठ स्वच्छ करण्याचा कारखाना**—हिमाचल प्रदेशांत मंडी येथें मिठाच्या खाणी सांपडल्याची बातमी आहे. मंडीपासून ३० मैलांवर कांग्रा व्हॅलीतील जोगींद्रनगर येथें हें मीठ स्वच्छ करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. मिठाचे थर कोठवर खोल आहेत हें पाहाण्यासाठी झ्यूरिचची एक स्विस कंपनी सध्या शोध घेत आहे.

**फोर्ड फौंडेशनचें कार्य**—भारत, पाकिस्तान आणि मध्यपूर्व येथील लोकांच्या रहाणीचें मान त्यांच्याच सहकार्यानें सुधारण्याच्या योजनांवर अमेरिकेच्या फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें गेल्या वर्षी ६५,५०,००० डॉलर्स रकम खर्च केली. ह्या कामांत संस्थेला ठिकठिकाणच्या सरकारांचें साह्य लाभलें होतें.

**पत्रकारांच्या संस्थेला मदत**—इंडिअन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नलिस्टस् ह्या संस्थेला बाटा शू कंपनीचे अध्यक्ष श्री. सैतान ह्यांनीं २,५०० रुपयांची देणगी दिली आहे. फेडरेशनची परिषद् कलकत्ता येथें नुकतीच भरली होती. त्यावेळीं दिल्ली येथें बांधण्यांत यावयाच्या इमारतीसाठीं ५ लाख रुपये जमविण्याचें ठरलें.

**रशिआची कागदाची निर्यात**—रशिआ, झेकोस्लोव्हाकिआ, फिनलंड, हंगेरी आणि पूर्व जर्मनी हे देश आग्नेय आशिआंतील देशांना आणि विशेषतः भारताला बऱ्याच प्रमाणांत कागदाची निर्यात करीत आहेत असें समजतें. ह्या कागदांत वृत्तपत्राचा कागद, पुस्तकांचा कागद आणि पुठ्ठा ह्यांचाहि समावेश आहे. जपानमधील कागद निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना ह्या बातमीनें चिंता वाटूं लागली आहे.

**सीलोनमधील चहाचे मळे**— सीलोनमधील चहाच्या किंमतींत गेल्या कांहीं आठवड्यांत बरीच घट झाल्यामुळें छोट्या मळेवाल्यांची परिस्थिति बिकट झाली आहे. सीलोनच्या चहाला परदेशीं असणारी मागणीहि घटत चालली आहे. छोट्या मळेवाल्यांना बँका कर्जेहि देईनाशा झाल्या आहेत. हें असेंच चालल्यास चहाचें उत्पादन कमी होण्याचा संभव आहे.

**मिठाच्या संशोधनासाठीं केंद्र**—भारताच्या कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड अॅग्रिकल्चरल रिसर्च संस्थेतर्फे मिठासंबंधीं संशोधन करणारें एक केंद्र सौराष्ट्रांत उघडण्यांत येणार आहे. मिठाचा दर्जा सुधारणें आणि उत्पादनाची किंमत कमी करणें, असे दोन हेतू साध्य करण्यासाठीं केंद्र खोलण्यांत येणार आहे.

**ब्रिटनमधील रस्त्यांवर होणारे अपघात**—ब्रिटनमधील रस्त्यांवर दर तासाला २५ अपघात होतात असा हिशोब करण्यांत आला आहे. दरवर्षी सुमारें २,१६,४९३ माणसें अपघातांत सांपडतात आणि सुमारें २,७४,९२९ वाहनांचा अपघातांशीं संबंध येतो. गेल्या वर्षी रस्त्यांवरील अपघातापायीं ब्रिटनला १४.६ कोटी पौंड खर्च आला. अपघातामुळें दर शंभर मिनिटाला एक माणूस दगावला.

**शेतीच्या हत्यारांसाठीं बक्षिसें**— स्थानिक गरजांना उपयुक्त ठरतील अशीं शेतीचीं हत्यारें तयार करण्यासाठीं हैद्राबाद सरकारनें एक योजना मंजूर केली केली आहे. खेडेगांवांतील कारागिरांना अशा उपयुक्त हत्यारांसाठीं २५० रुपयांचीं चार बक्षिसें देण्यांत येणार आहेत. राज्याचे चार विभाग पाडून प्रत्येक विभागासाठीं एक बक्षीस ठेवण्यांत आलें आहे.

**बडोदा येथील बससर्व्हिस**— बडोदा म्युनिसिपालिटीनें एक ठराव मंजूर करून शहरांतील बससर्व्हिस आपल्या ताब्यांत घेतली आहे. त्याचप्रमाणें, बकरोल येथील डेअरी फार्म मुंबई सरकारनें कांहींहि न घेतां आपणास द्यावें अशीहि मागणी करण्यांत आली आहे. बडोद्याच्या नागरिकांना ताजें दूध पुरवितां यावें म्हणून ही मागणी करण्यांत आली आहे.

**मधमाशा पाळण्याचें शिक्षण**—पंजाब सरकारनें कांग्रा जिल्ह्यांत मधमाशा पाळण्याच्या धंद्याचें शिक्षण देणारें एक केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. ता. १५ एप्रिल पासून ५ आठवडे पर्यंत शिक्षण देण्यांत येणार आहे. १५ विद्यार्थ्यांना केंद्रांत प्रवेश दिला जाणार आहे.

**युरोपमधील जादा लोकसंख्या**—इंटर नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचे डायरेक्टर जनरल मि. मोर्स ह्यांनीं अमेरिकन राष्ट्रांना अशी सूचना केली आहे कीं, त्यांनीं युरोपमधील जादा लोकसंख्या आपल्या देशांत वसवून घेऊन शांतता टिकविण्यांत मदत करावी. प. गोलार्धांतील अमेरिकन राष्ट्रांची मजूर-विषयक परिषद् लवकरच भरणार आहे. परिषदेला पाठविलेल्या अहवालांत वरील सूचना करण्यांत आली आहे.

**प. जर्मनीच्या कारखान्यांत हिंदी विद्यार्थी**—डॉर्टमंड चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें असें जाहीर केलें आहे कीं चालू सालीं भारतामधील २५० शिकाऊ विद्यार्थी प. जर्मनींतील कारखान्यांत काम शिकण्यासाठीं येणार आहेत.

**अमेरिकेची चांदी परत करणार**— भारतानें युद्धकाळांत अमेरिकेकडून २२.६ कोटी औंस चांदी उधार-उसनवार पद्धतीनें घेतली होती. जपानशीं तह झाल्यावर ५ वर्षांनंतर भारतानें ही चांदी परत करावयाची आहे. जपानशीं करण्यांत आलेला शांतता-तह सुमारें एक महिन्यानें अंमलांत येईल. म्हणजे, १९५७ पासून भारताला चांदी परत करावी लागेल. अलीपूर येथें उभारण्यांत आलेल्या कारखान्यांत जुन्या नाण्यांतील चांदी काढण्याचें काम करण्यांत येणार आहे.

**रुग्णांसाठी सिनेमाचा उपयोग**— अमेरिकेंतील रुग्णालयांत रोग्यांचें मनोरंजन करण्यासाठी १६ मिलिमीटरच्या फिल्म्सचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे. फ्रान्समध्यें दोन रुग्णालयांनीं सिनेमागृहें मुद्दाम बांधलीं आहेत—ज्या रुग्णांना चालतां येत नाहीं त्यांना तेथें चाकाच्या गाड्यांवरून नेण्यांत येते. अमेरिकेंत वार्डांच्या छतावर चित्रपट दाखविण्यांत येतो.

**अमेरिकेचा संरक्षणखर्च**— अमेरिका आपल्या संरक्षणासाठीं लवकरच दररोज १६.७ कोटी डॉलर्स खर्च करूं लागेल, असें अमेरिकेच्या संरक्षण-खात्याच्या चिटणिसांनीं नुकतेंच जाहीर केलें. त्यांच्या मतें, खर्चाचें हें प्रमाण १९५४ साल अखेर तरी चालू राहील.

**चीन एंजिनें घेण्यास तयार**— मॉस्को आर्थिक परिषदेला आलेल्या चिनी प्रतिनिधीमंडळानें असें जाहीर केलें कीं परिषदेला हजर राहिलेल्या एका ब्रिटिश कंपनीकडून आपण रेल्वेचीं १०० एंजिनें घेण्यास तयार आहों.

**रशिआंतील किंमती उतरविल्या**—रशिअन सरकारनें दरवर्षीप्रमाणें चालू सालींहि ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंच्या किंमतींत १५ टक्क्यांनीं कपात केली आहे. १९४७ सालापासून रोजच्या वस्तूंच्या किंमतींत करण्यांत आलेली ही पांचवी कपात आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— कांहीं भागीदार व ठेवीदार यांची सूचना —

—जाहिरात बंद करूं नका—

★ ★ जाहिरातीनें कंपनीची प्रगति समजते ★ ★

卐 नवीन मशिनरीनें 卐

—चाळीस हजार पोतीं साखर म्हणजे "कंट्रोल" दरानें—

बत्तीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली

आणखी चाळीस हजार पोतीं साखर तयार होईल

साखरविक्री सरकारी नियंत्रणाप्रमाणें होते

शेअर-विक्री सुरू आहे

## साखरविक्री होईपर्यंत ठेवी स्वीकारल्या जातील

शेअर व ठेवींचे फॉर्म कंपनीचे पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० कॉमनवेल्थ बिल्डिंग,
सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. १३ एप्रिल १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.

# अर्थ

बुधवार, ता. २३ एप्रिल, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकाराच्या इमारतीचा पाया मजबूत हवा

### दोन उद्बोधक भाषणें

भारतांतील वेगवेगळ्या राज्यांतील सहकारी खात्यांचे उच्च अधिकारी व सहकारी संस्थांचे महत्त्वाचे पदाधिकारी ह्यांच्यासाठीं लहान मुदतीचा एक खास शिक्षणवर्ग पुणें येथें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. बी. रामराव ह्यांच्या हस्तें नुकताच उघडण्यांत आला. दीर्घ मुदतीचा, दुसरा वर्ग जुलैमध्यें सुरू होणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या पुढाकारानेंच हे वर्ग आखण्यांत आले असून त्यांचा खर्चहि रिझर्व्ह बँकच सोसणार आहे. सहकारी चळवळींची वाढ सर्वच राज्यांतून द्रुतगतीनें होत गेली आहे आणि रिझर्व्ह बँकेचा तिच्याशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आतां निर्माण झालेला आहे. केंद्रीय संस्थांमार्फत खालपर्यंत भांडवलाचा पुरवठा करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेकडे अधिकाधिक येत चालली आहे. सहाजिकच, ज्यांच्या हातीं आपला पैसा हवाली करावयाचा, त्यांची लायकी व पात्रता वाढविण्याची रिझर्व्ह बँकेस वाटूं लागलेली तळमळ क्रमप्राप्तच आहे. मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें पुणें येथें चालविलेल्या कोऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेजकडे हें काम सोपविण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें, ह्यांत इन्स्टिट्यूटचा गौरवच झालेला आहे. आपल्या भाषणांत श्री. रामराव ह्यांनीं रिझर्व्ह बँकेनें खेडेगांवीं भांडवलपुरवठा व सहकारी चळवळ ह्यांचेबाबत काय काय केलें, ह्याचें दिग्दर्शन केलें. रिझर्व्ह बँक कायद्यातील तरतुदी इतक्या दीर्घकाल कायद्याच्या पुस्तकांतच का राहिल्या, हें अर्थातच त्यांना सांगण्याचें कारण नव्हतें. गेल्या कांहीं वर्षांत मात्र थोडी हालचाल चालू झालेली आहे आणि परिस्थितीचें दडपण पडूं लागलेलें आहे. श्री. रामराव ह्यांनीं तज्ज्ञ व लायक अधिकारी व नोकर वर्गाचें सांगितलेलें महत्त्व कोणासहि पटण्याजोगें आहे.

दीर्घकाळपर्यंत भारत हा देश शेतीप्रधानच रहाणार आणि शेती ही लहान शेतांतूनच स्वतंत्रपणें केली जाणार. शेती हें शेतकऱ्याचें एकमेव चारितार्थाचें साधन पिढ्यान् पिढ्या असल्यानें त्याला जमिनीबद्दल विलक्षण आत्मीयता वाटते. देशाच्या विकासाच्या सद्यःस्थितींत तरी सरकारी एकत्रित शेतीच्या योजना अव्यवहार्य ठरतील. व्यक्तिगत व एकसूत्रीपणाचा अभाव असलेल्या शेतीच्या पद्धतींत प्रगति ही हळुहळूच होणार. व्यक्तिगत प्रयत्नास निरुत्साह न करतां, मोठ्या प्रमाणावरील उद्योगाचे कांहीं फायदे शेतकऱ्यास मिळण्याचें योग्य साधन सहकारी चळवळ, हें एकच आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशांत, शेतीस भांडवल पुरवठा करण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँकेनें करावा, हें स्वाभाविकच आहे. रिझर्व्ह बँक कायद्यानें ह्या बाबीस महत्त्व दिलेलें आहे. परंतु, युद्धकाळांत विशेष कांहीं करण्याचा पाया घालणें अशक्य होतें. आतां मात्र रिझर्व्ह बँक ह्या प्रश्नाकडे लक्ष एकवटत आहे.

खेडेगांवांत व लहान गांवांत बँकिंगचा प्रसार कसा करतां येईल, ह्याचा विचार करण्यासाठी श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांच्या अध्यक्षतेखालीं १९४९ मध्यें एक कमिटी नेमण्यांत आली होती. तिच्या कित्येक शिफारशींच्या अम्मलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. शेतीच्या भांडवलपुरवठ्याची अखिल भारतीय पहाणी करण्यासाठीं गाडगीळ—गोरवाला कमिटी नेमण्यांत आली आहे, तिचा अहवाल ऑक्टोबरपर्यंत तयार होईल अशी अपेक्षा आहे. परंतु, तोपर्यंत वाट न पहातां रिझर्व्ह बँकेनें सहकारी संघटनेच्या मजबुतीकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला आहे. अर्थात्, सहकारी शेती—कर्ज पुरवठ्याचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा व बिकट असा आहे. कित्येक राज्यांत केंद्रीय बँका आज अस्तित्वांत नाहींत व सहकारी चळवळ विशेष प्रगत झालेली नाहीं, तेथील सरकारांशीं विचारविनिमय करून वाढीच्या योजना आखल्या जात आहेत. परंतु, त्या सर्वांस आवश्यक असा शिक्षित व तज्ज्ञ नोकरवर्ग उपलब्ध नाहीं, ही मोठी अडचणीची बाब आहे, आणि त्याच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था झाली नाहीं तर ह्या योजनांची प्रगति खुंटल्याविना रहाणार नाहीं, असा श्री. रामराव ह्यांनीं आपल्या भाषणाचा समारोप केला.

ट्रिप्लिकेन येथें भाषण करतांना मद्रास राज्याच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. जे. सी. रायन, ह्यांनीं सहकारी स्टोअर्स चळवळीसंबंधीं काढलेले उद्गार मननीय आहेत. मध्यस्थ दलाल नाहींसा करण्यास निघालेल्या स्टोअर्स सोसायट्या स्वतःचा नवा दलाल निर्माण करीत आहेत, सोसायट्यांनीं नेमलेल्या नोकरांपैकीं कित्येक नोकर खासगी व्यापाऱ्यांपेक्षाहि वाईट आहेत, खोटीं मापें व भेसळ वगैरे स्वरूपाचे दुराचार त्यांच्यामध्यें बोकाळले आहेत, इत्यादि गोष्टींचा त्यांनीं उल्लेख केला. युद्धकाळापूर्वीं कंझ्यूमर्स स्टोअर्सचा व्यवहार त्यांच्या सभासदांपुरताच मर्यादित होता; आतां सर्वसामान्य नागरिकांशीं ते मोठ्या प्रमाणावर व्यवहार करीत आहेत. हे बाहेरचे लोक सोडले, तरी सोसायट्यांच्या सभासदांत सुद्धां खरी सहकारी वृत्ति रुजलेलीच नाहीं, ही मोठी अडचण आहे. कंझ्यूमर्स स्टोअर्सच्या सभासदांनीं सोसायटीच्या दैनंदिन कारभारांत लक्ष घातलें नाहीं, तर खासगी दुकानांच्या वाईट गोष्टी मात्र त्यांत शिरतील; त्यांची कार्यक्षमता मात्र येणार नाहीं, हें श्री. रायन यांनीं स्पष्ट केलें.

सहकारी सोसायट्यांनीं आपला नोकरवर्ग निवडतांना दक्षता बाळगण्याचें महत्त्वहि त्यांनीं प्रतिपादन केलें. गिऱ्हाइकांशीं आदबीची वागणूक, व्यवहारांत चोखपणा, व्यवस्थितपणा, तत्परता, इत्यादि गुण त्यांच्यांत बिंबविण्यांत आले पाहिजेत. कंझ्यूमर्स सहकारी चळवळींचे बाबतींत मद्रास राज्य हें प्रथमपासूनच अग्रेसर आहे, परंतु तेथेंहि त्याच्या भवितव्याबद्दल चिंता निर्माण झालेली आहे. सोसायट्यांच्या संख्येंत व व्यवहारांत गेल्या कांहीं वर्षांत मोठी वाढ झाली असली तरी ती खऱ्या सहकारी तत्त्वाच्या

फळावर आधारलेली नसून, कृत्रिम कारणांमुळेंच ती झालेली आहे. त्या कारणानें, त्या चळवळीचा पाया कच्चा राहिलेला आहे. मद्रास राज्याचे मानानें मुंबई राज्यास ही गोष्ट अधिकच प्रमाणांत लागू आहे.

श्री. रामराव व श्री. रायन् ह्यांचीं भाषणें एकच गोष्ट दर्शवितात: सहकारी चळवळीच्या वाढीसाठीं वरच्या बाजूनें मोठेपणानें प्रयत्न चालू असले, तरी टिकाऊ प्रगतीसाठीं आवश्यक त्या गोष्टींचा अभाव असल्यानें प्रत्यक्ष फलप्राप्तीपेक्षां अशा प्रयत्नांची नोंदच सहकाराच्या प्रगतीची साक्ष देण्यासाठीं उपयोगी पडावयाची! जरूर तो पायाच तयार नसेल, तर वरची इमारत कितीहि आवश्यक व आकर्षक वाटली तरी तिला आंतून भेगाच गेलेल्या असणार. विशिष्ट स्थानीं नोकरी करणाऱ्या व म्हणून सहकाराची महति गाणाऱ्या सत्प्रवृत्त लोकांच्या प्रयत्नांनीं प्रत्यक्ष प्रगतीचें पाऊल किती पुढें पडणार, ह्यास मर्यादा आहे. ज्यांना त्याचा प्रत्यक्ष फायदा मिळावयाचा, अशांतूनच नेते व कार्यकर्ते निर्माण व्हावयास पाहिजेत. त्यासाठीं, फारच व्यापक प्रयत्नांची आवश्यकता आहे. अर्थात्, त्याकरितां थांबून रहाणें चुकीचेंच होईल आणि त्याचा दोष सरकारी अधिकाऱ्यांवर घालण्यांत अर्थ नाहीं. सहकारी शिक्षणवर्गांतून बाहेर पडलेल्या अधिकाऱ्यांकडून व नोकरांकडून किती अपेक्षा करतां येईल, ह्याची कल्पना असलेलीच बरी.

## मॉस्को परिषद आणि ब्रिटनमधील बेकारी

ब्रिटनमध्यें लँकेशायरमधील कापडाच्या गिरण्यांत पसरलेल्या मंदीमुळें बेकारीची मोठी लाट उसळली आहे. १९४६-४७ सालीं ब्रिटनला कोळशाचा तुटवडा पडला होता त्यावेळेपासून इतक्या मोठ्या प्रमाणावर कामगार बेकार झाले नव्हते. मार्च १७ तारखेपर्यंत पुऱ्या झालेल्या महिन्यांत सुमारें ४,३३,००० कामगारांनीं आपलीं नांवें बेकार म्हणून नोंदविलीं. श्रम करणाऱ्या एकूण लोकांशीं २·१ टक्के असें हें प्रमाण पडतें. कापडाच्या धंद्यांत ह्याच महिन्यांत ४६,७०० कामगारांना नौकरीला मुकावें लागलें. कापड गिरण्यांत मंदीचें वातावरण सुरू झाल्यापासून सुमारें १,००,००० कामगारांना कामावरून काढण्यांत आलें आहे. त्यापैकीं ६६,००० स्त्रिया आहेत. बेकार कामगारांची मोजदाद करण्यांत आली, तेव्हांपासून गेलेल्या काळांत परिस्थिति अधिकच बिकट झाल्याच्या वार्ता आल्या आहेत. कापडाच्या धंद्यांतील कामगार बेकार असतांना इतर कांहीं धंद्यांतून मात्र माणसांचा तुटवडा भासत आहे. ब्रिटनमध्यें मजूर सरकार अधिकारावर होतें तेव्हां त्या सरकारनें योजनाबद्ध अर्थ व्यवस्थेचें धोरण स्वीकारलें होतें. आतां हुजूर सरकार अधिकारपदस्थ असलें तरी अजून त्या सरकारनें पूर्वीच्या अर्थव्यवस्थेंत फारशी ढवळाढवळ केलेली नाहीं. ह्यावरून मजूर सरकारचें अर्थविषयक धोरण फारसें यशस्वी झाल्याचें दिसत नाहीं. ह्याच सुमारास मॉस्को येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेंत रशिआ, बल्गेरिआ, रुमेनिआ इत्यादि पूर्व-युरोपांतील राष्ट्रांनीं ब्रिटनकडे कापडाची मागणी केल्याचें समजतें. ह्या मागणीचा फायदा घेऊन ब्रिटिश कापडाच्या धंद्याला सांवरता येणें शक्य आहे.

**मॉस्को येथील आर्थिक परिषद**— मॉस्को येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेचे एक संघटक मि. ऑस्कर लँगे ह्यांनी असें सांगितलें कीं, भांडवलदारी राष्ट्रांतील ३०० व्यापारी प्रतिनिधी रशिअन संस्थांशीं सौदे करणार आहेत.

## जातिवंत कुत्र्यांच्या निर्गतीमुळें इंग्लंडला डॉलर्सची प्राप्ति

ग्रेट ब्रिटनमधील जातिवंत कुत्र्यांच्या निर्गतींत युद्धोत्तर काळांत वाढ होत गेली आहे. १९५१ सालीं ५७ देशांकडे २,२१० जातिवंत कुत्रे निर्गत करण्यांत आले; १९४७ मध्यें फक्त ५७७ कुत्र्यांची निर्गत झाली होती. १९५१ मधील निर्गतीपेक्षां १९५० मधील निर्गत २२३ नें कमी होती. १९५१ मधील निर्गतींपैकीं निम्मे कुत्रे डॉलर गटाकडे गेल्यामुळें त्यांनीं मोल्यवान् डॉलर्स ब्रिटनला मिळवून दिले आहेत. ब्रिटिश कुत्रे कुत्र्यांच्या प्रदर्शनांत बक्षिसें मिळवितात, असा त्यांचा लौकिक आहे कुत्र्याचें वय, जातिवंतपणा व दर्जा, ह्यावर किंमत अवलंबून राहते. एका कुत्र्यास आलेली कमाल किंमत १९५१ मध्यें २२३ हजार रुपये भरली. ब्रिटिश कुत्र्यांचा खप मुख्यतः अमेरिकेंत होतो; त्या देशानें ८५२ कुत्रे घेतले. इतर कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकेची खरेदी पांचपट भरली व ब्रिटिश निर्गतीपैकीं एकतृतीयांश निर्गत अमेरिकेनें घेतली. अमेरिकेच्या खालोखाल कॅनडा (१६७ कुत्रे), फ्रान्स (१५०), ऑस्ट्रेलिया (११७), इटली (८३), स्वित्झर्लंड (८६), बेल्जिअम (७९), द. आफ्रिका (५८) आणि ब्राझील (५४), असे इतर देशांनीं आयात केलेल्या कुत्र्यांचे आकडे आहेत. कॉकर स्पॅनिअल्सची जागा मिनिअेचर पूडल्सनीं घेतली आहे. बॉक्सर्सच्या निर्गतींतहि वाढ झाली आहे. अमेरिकन कुत्र्यांचीहि निर्गत वाढली आहे. दक्षिण अमेरिकेंत खपणारे कुत्रे यु. स्टेट्समधूनच मुख्यतः जातात; त्यांचे खालोखाल जर्मन व ब्रिटिश कुत्र्यांचा खप तेथें होतो.

## दि बुधगांव बँक लि., बुधगांव

१९५१ ह्या वर्षीं बुधगांव बँक लि. नें १४,५७९ रु. निव्वळ नफा मिळविला. त्यांत शिल्लकी नफा मिळविल्यावर नफा वांटणीस १४,७३५ रु. आले. त्याची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—रिझर्व्ह फंड ३,००० रु., ४% करमाफ डिव्हिडंड ४,००० रु., कर तरतूद ४,००० रु., नोकरवर्गास बोनस १,०६५ रु., इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड २,४०० रु. वरील ४% खेरीज आणखी २% डिव्हिडंड ई. फंडांतून देण्यांत आलें. बँकेच्या एकूण ११ लक्ष, १३ हजार रु. च्या खेळत्या भांडवलापैकीं १ लक्ष रु. वसूल भांडवल असून ९६,३७५ रु. रिझर्व्ह व इतर फंडांत आहेत. त्यांत आतां भर पडली आहे. बँकेनें १,२०,१०४ रु. रोख व १,९८,७३६ रु. इतर बँकांत ठेवून आणि १,९१,१८० रु. चे रोखे बाळगून ५,६३,२९४ रु. कर्जांत गुंतविले आहेत. ह्या आकड्यांवरून बँकेच्या किफायतशीर व्यवहाराची कल्पना येईल. अहवालाचे वर्षीं तिनें कमिशन, एक्सचेंज व ब्रोकरेजचें ६,३९० रु. उत्पन्न मिळविलें आहे. बँकेची माधवनगर येथें एक शाखा आहे. (चेअरमन : रा. ब. व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर : आर. एम. गोकावे.)

## साखरेचें उत्पादन भरपूर, पण निर्गत होईल का?

चालू वर्षीं भारतांतील साखरेचें उत्पादन १३ लक्ष, ५० हजार टन होईल अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षीं तें ११ लक्ष टन झाले होतें. गेल्या वर्षीच्या उत्पादनापैकीं १ लक्ष, ७० हजार टन साखर शिल्लक राहिली. म्हणजे, एकूण १५ लक्ष, २० हजार टन साखर आतां उपलब्ध आहे. कराचींत हिंदी साखरेपेक्षां क्युबाची साखर मणास ६ रुपयांनीं स्वस्त असल्यामुळें हिंदी साखरेच्या निर्गतीस परवानगी दिल्यानें तिचा तेथें खप होईल, अशी मात्र खात्री नाहीं.

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें शहर.

मा. बी. बी. वाळवेकर, अध्यक्ष दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें यांचें १४ वें वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील भाषण ( ता. ९ मार्च १९५२. )

आर्थिक मंदीचे कालांतही बँकेच्या ठेवींत विशेष घट झालेली नाहीं. तसेंच कर्ज देण्याचे बाबतींतही तारणावरील कर्जें देण्याकडे विशेष लक्ष दिलें जातें. आपल्या बँकेची सरकारी रोख्यांत गुंतवणूक रु. २१,८६,९८४–४–० इतकी आहे, अहवाचे सालीं रिझर्व्ह बँकेनें बँक रेट ३ टक्केचा ३½ टक्के केल्यामुळें बाजारभावावर परिणाम होऊन सिक्युरिटीजच्या किंमती बऱ्याच उतरल्या. तथापि ह्या उतरलेल्या किंमती आज ज्या भावांत दिसत आहेत ते भाव कायम टिकणारे नसून, त्यांत आणखी कांहीं वाढ होईल असें वाटतें. आपल्या सर्व सिक्युरिटीज, ह्या मुदतीच्या आहेत. त्यापैकीं कांहीं अल्प, कांहीं मध्यम व कांहीं लांब मुदतीच्या आहेत. ज्या वेळीं त्यांची परतफेड होईल, त्या वेळेस जी किंमत सरकार परत देण्यास बांधलें गेलें आहे त्याचा विचार करतां, सिक्युरिटीजमध्यें आपणांस फारसें नुकसान येण्याचें कारण दिसत नाहीं. याशिवाय, सालोसाल बँक या फरकाकरितां डिप्रीसिएशन फंड काढत आहे, व सदरहू फंड हा शक्यतों जास्तींत जास्त काढण्याचा, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा संकल्प आहे.

"गेल्या महिन्यांत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एकदम आलेली मंदीची लाट होय. भारत सरकारच्या धोरणानुसार, सर्व जिनसांच्या किंमती ह्या खालीं आल्या आहेत, व आणखीहि कदाचित् खालीं येण्याची शक्यता आहे. भारत सरकारचें चालू वर्षाचें जें बजेट सादर केलें आहे, त्यामुळें व त्या वेळीं केलेल्या भाषणामुळें किंमती खालीं आल्या आहेत असें म्हटलें जातें. वास्तविक किंमती इतक्या उतराव्यात, असें कांहींही बजेटमध्यें दिसत नाहीं. तथापि, इतर कांहीं कारणांमुळें ही मंदीची लाट आलेली दिसत आहे. कांहीं दिवसांनीं ही लाट नाहींशी होऊन किंमती स्थिरावतील असा भरंवसा वाटतो."

"आपल्या बँकेच्या इमारतीस येत्या जून–जुलैचे सुमारास प्रारंभ होऊं शकेल, अशी आशा वाटत आहे. हल्लीचें भाडेकऱ्यांची नवीन होणाऱ्या इमारतींत उभयतांचे विचारानें, जागा देण्याचे प्रश्नाचा निकाल आपसांत समजुतीनें मिटत असून, त्याप्रमाणें कांहीं भाडेकऱ्यांनीं जागा मोकळी करून देण्याचे करारनामे करून दिले आहेत व कांहींचे होत आहेत. साधारणतः इमारतकामाचें अंदाजी खर्चाची रकम रु. २ लाखांपर्यंत जाईल असें वाटतें. बँकेच्या स्थैर्याचें दृष्टीनें व पुढील वाढीचें व उत्पन्नाचे दृष्टीनें ही योजना बँकेनें हातीं घेतली आहे.

"बँकिंग ॲक्ट अंमलांत आल्यापासून अगदीं लहान बँकांना यापुढें अवघड होईल असें दिसतें. कारण नित्यनैमित्तिक व दैनंदिन सर्व चालविणें व कायद्याप्रमाणें रकमांची गुंतवणूक करणें वगैरे गोष्टी लहान संस्थांना, अवघड होत चालल्या आहेत. त्यामुळें अशा कांहीं संस्था, एकत्रीकरण करून घ्यावें म्हणून सुचवीत आहेत. वास्तविक अशा संस्थांचें कामकाज हें त्या संस्थेच्या युनिटच्या मानानें चांगलेंच असतें, असा अनुभव आहे. आपल्या बँकेकडेहि एका बँकेचें एकत्रीकरणाचें प्रपोझल आलें आहे, व त्याप्रमाणें वाटाघाटी चालू आहेत. त्या जर फलद्रूप झाल्या तर पुन्हा एकवार सभासदांची सभा घ्यावी लागेल. अशा एकत्रीकरणामुळें आपली बँक शेड्यूल्ड होण्यास मदत होईल, असा भरंवसा वाटतो."

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा : ३, ५, १० वर्षे सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकिटें
२ माहीम दर ९३–८, ८७–८, ७५ अनुक्रमें.
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

## हिंदी मशीन टूल्सचे कारखानदार व नियोजित सरकारी कारखाना

( श्री. एम. बी. जांभेकर, इंडियन मशीन टूल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष, ह्यांचें पांचव्या वार्षिक सभेंत भाषण, १९–१–१९५२ )

"भारत सरकार स्वतःचा मशीन टूल्सचा कारखाना काढीत आहे. त्यांत १९५३–५४ पर्यंत लेथ व इतर मशीनटूल्सची जुळणी करण्यांत येईल; त्यानंतर कांहीं अंशीं प्रत्यक्ष उत्पादनासहि प्रारंभ होईल. परदेशांतून सुटे भाग आणून त्यांची जुळणी येथें करण्यांत बराच धोका आहे. कारखान्यांतच सुटे भाग तयार करून त्यांचे लेथ बनविण्यापेक्षा केवळ जुळणी करणें कितीतरी सोपें आहे. सरकारी कारखान्यास भरपूर काम दाखविण्याच्या नादांत, ज्या प्रकारच्या मशीन टूल्सची जुळणी करावयाची, त्यांस भारतांत फार मोठी मागणी आहे असें भासविलें जाण्याचा संभव आहे. त्यामुळें, त्या मशीन टूल्सच्या सुट्या भागांची मोठी आयात होऊं लागेल आणि त्यांची जुळलेली मशीनटूल्स हिंदी कारखानदारांनीं बनविलेल्या मशीन टूल्सशीं अनिष्ट स्पर्धा करूं लागतील. हिंदी मशीन टूल्स कारखानदारांच्या हिताकडे सरकार दुर्लक्ष करील, असें नाहीं; पण स्वतःच्या कारखान्याचें हित व इतर कारखान्यांचें हित, असा विरोध निर्माण झाला, तर सरकारी कारखान्याच्या हितासच प्राधान्य मिळण्याचा मोठा संभव आहे. तेव्हां, जीं मशीन टूल्स आज भारतांत तयार होत नाहींत, अशाच मशीन टूल्सची जुळणी सरकारी कारखान्यांत केली जाईल, अशी दक्षता बाळगली पाहिजे. ज्या क्षेत्रांत हिंदी मशीन टूल्स कारखानदारांनीं बरीच प्रगति केली आहे, त्यांत सरकारी कारखान्यानें प्रवेश केला, तर ही सर्व प्रगति संपुष्टांत येऊन मोठें भांडवल निष्क्रिय होऊन जाईल. म्हणून, जीं मशीन टूल्स आज भारतांत प्रत्यक्ष तयार होत आहेत किंवा ज्यांच्या उत्पादनाची पूर्व-तयारी चालू आहे, अशांची जुळणी सरकारी कारखान्यांत करण्याची योजना सरकारनें हातीं घेऊं नये."

"सरकारी कारखान्याशीं संबंधित असा एक मोठा अधिकारी स्वित्झरलंडमध्यें जाऊन सुट्या भागांच्या आयातीची व्यवस्था करीत आहे, असें समजतें. प्रत्यक्षांत नसलेल्या परंतु वाढवून दाखविलेल्या मागणीस पुढें करून, अशा सुट्या भागांच्या जुळणीस प्रचंड वाव आहे असें दर्शविण्यांत येईल आणि हिंदी बाजारपेठेंत त्यामुळें मंदी निर्माण होईल, अशी भीति वाटते. सरकारी कारखान्याच्या उभारणीसाठीं मशीन टूल्सची त्याची गरज काय आहे, ह्याची कांहींच कल्पना नाहीं. आज भारतांत तयार होणारीं पुष्कळशी मशीन टूल्स त्यासाठीं लागतील, तेव्हां सरकार त्यासाठीं विदेशी मशीन टूल्सचा अवलंब करणार नाहीं अशी आशा आहे."

## सहा वर्षांचा पुनर्घटनेचा कार्यक्रम — कांहीं दुरुस्त आंकडे

पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाचें रूपान्तर कोलंबो योजनेशीं सुसंगत राखण्यासाठीं सहा वर्षांत करण्यांत आलें आहे. या सुधारलेल्या कार्यक्रमानुसार विजेच्या शक्तीचें उत्पादन व पाटबंधाऱ्यांचीं कामें यांत पर्वांच्या योजनेच्या मानानें बरीच वाढ होणार आहे. दुरुस्त अंदाजाप्रमाणें धान्याचें उत्पादन ३० लक्ष टनांच्या ऐवजीं ७२ लक्ष २० हजार टन होईल. पहिल्याच वर्षी पाटबंधाऱ्यांचीं कामें व विद्युत् शक्तीचें उत्पादन यासाठीं तीनपट जास्त जमीन वापरली जाईल. तलाव व विहिरी व लहान कालवे यांच्या दुरुस्तीमुळें ७० लक्ष एकर जमिनीला फायदा मिळेल. पडीत जमिनींची लागवड करून ४० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं येईल व मध्यवर्ती ट्रॅक्टर संघटनेच्यामुळें ५ लक्ष एकर जमीन नांगरली जाईल. दुरुस्त कार्यक्रमाप्रमाणें शेतीच्या उत्पादनावर पूर्वीपेक्षां जरा कमी भर ठेवण्यांत आला आहे; परंतु कापूस, ताग, व तेलबिया यांचें उत्पादन अनुक्रमें मूळचें १ लक्ष ९५ हजार टन, ३ लक्ष ६८ हजार टन व १ लक्ष ५० हजार टन इतकें अधिक आकारण्यांत आलें होतें त्याऐवजीं तें २ लक्ष १४ हजार टन, ३ लक्ष ७५ हजार टन व ३ लक्ष ७५ हजार टन याप्रमाणें आतां आकारलें गेलें आहे. सहा वर्षांच्या कार्यक्रमासाठीं रु. २३३३ कोटी खर्च होतील, त्यापैकीं रु १५५१ कोटी भारतांतील अंतर्गत साधनांनीं उभारले जातील. शेती व पाटबंधारे यासाठीं पंचवार्षिक योजनेंत रु. ३५७ कोटी संकल्पित खर्च होता. आतां सहा वर्षांत हा खर्च रु. ३९८ कोटी होईल. खर्चाच्या बाबतींत इतर वाढ पुढें दाखविल्याप्रमाणें आहे. कालवे व वीज या बहुविध योजनांसाठीं रु. २२८ कोटीं ऐवजीं रु. २५० कोटी खर्च होतील. वाहातूक व दळणवळण यांसाठीं रु. ६५१ कोटी ऐवजीं रु. ७०२ कोटी खर्चीं पडतील. खाणी व उद्योगधंदे यांसाठीं रु. १२३ कोटीं ऐवजीं रु. १७९ कोटी खर्च होईल. इतर किरकोळ बाबतींत रु. २९१ कोटीं ऐवजीं रु. ४२६ कोटी खर्च होतील.

सहा वर्षांच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें राष्ट्रीय उत्पादनांत १० टक्के वाढ होणार आहे. १९५०–५१ चें राष्ट्रीय उत्पन्न रु. १० हजार ४०० कोटी धरल्यास १९५६–५७ सालीं उत्पन्न रु. ११ हजार ५०० कोटी होईल. यामुळें भारताच्या लोकसंख्येंत होणारी संभाव्य वाढ जमेस धरूनहि दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्न अल्प प्रमाणांत वाढेल.

सहा वर्षांच्या कार्यक्रमाला लागणाऱ्या वाढत्या खर्चाबद्दल असें म्हणतां येईल, कीं कांहीं लहान लहान कामांचा खर्च चालू उत्पन्नांतून केला जाईल. या लहान लहान योजना मूळच्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट नव्हत्या. याशिवाय पाण्यावरील लेव्ही, सुधारणा दिसून आल्यामुळें लादलेला कर, विक्रीकराची सुधारलेली व्यवस्था, करमणुकीचीं साधनें व मोटारी इ. वरील कर यांमुळें कांहीं पैसा उभारतां येईल. बचतीच्या लहान योजनांमुळें ६ वर्षांत रु. २४० कोटी उभारले जातील व भारत सरकार व राज्य सरकारें मिळून रु. १३७ कोटी कर्जद्वारें उभारतील. रु. १५५१ कोटी अंतर्गत साधनांनीं भारतांतच उभारतां येतील. हीं साधनें म्हणजे सरकारी शिल्लक, नवीन कर, कर्जें, बचतीच्या योजना व सार्वजनिक स्वरूपाच्या संस्थांकडून होणारी सरकारी प्राप्ति होय.

## अमेरिका आणि आशिया

सॅटरडे रिव्ह्यू ऑफ लिटरेचर ह्या नियतकालिकानें अमेरिका अँड दि चॅलेंज ऑफ एशिया ह्या शीर्षकाखालीं आपला एक खास अंक कांहीं महिन्यांपूर्वी काढला होता. अमेरिकन नागरिकांना आशियांत चाललेल्या क्रांतिकारक घडामोडींची कल्पना नसते. ती करून देण्याचा ह्या अंकाचा उद्देश आहे. आशियांतील भारत, चीन, जपान इत्यादी देशांच्या सद्यःपरिस्थितीवर प्रकाश टाकणारे माहितीपूर्ण आणि विवेचक लेख ह्या अंकांत देण्यांत आले आहेत. त्याशिवाय ह्या देशांसंबंधीच्या कांहीं निवडक ग्रंथांचा परिचयहि करून देण्यांत आलेला आहे. आशिया खंडांत जगांतील अर्ध्यापेक्षाहि अधिक लोकसंख्या असल्यानें आणि तथाकथित पूर्व-पश्चिम वादांत आशियाला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें असल्यानें ह्या अंकाचें औचित्य विशेष रीतीनें प्रत्ययास येतें.

अमेरिकन नागरिकांनीं आशियासंबंधीं विचार करतांना कोणत्या गोष्टींची स्मृति कायमची ठेवली पाहिजे, ह्यासंबंधीं प्रस्तुत अंकांत चांगलें मार्गदर्शन करण्यांत आलेलें आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था ही उत्पादनाच्या तंत्राच्या दृष्टीनें जगांत पहिल्या प्रतीची असल्यानें, अमेरिकन नागरिकांना तंत्रदृष्ट्या मागासलेल्या आणि म्हणून दरिद्री असलेल्या राष्ट्रांची मनोरचना नीटशी न कळल्यास त्यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. आशियांतील बहुतेक लोक उपाशी पोटींच झोपी जातात. बहुतेक लोक निरक्षर आणि लिहितां–वाचतां न येणारे असे आहेत. बहुसंख्य लोक कमालीच्या दारिद्र्यांत कसेबसे जगत आहेत इतकेंच. त्यांच्यापैकीं कित्येकांनीं डॉक्टर कसा असतो तो पाहिलेला सुद्धा नाहीं. लोकशाही कशाला म्हणतात तें बहुतेक आशिअन नागरिकांना माहीत नाहीं. नागरिक–स्वातंत्र्याची चव कित्येकांनीं थोडीसुद्धां चाखलेली नाहीं. आशिआंतील बहुसंख्य लोक सध्याच्या कुचंबणेला इतके कंटाळलेले आहेत, कीं ह्या परिस्थितीपेक्षा दुसरी कोणतीही परिस्थिति बरी असें त्यांना वाटूं लागलें आहे आणि त्यासाठीं त्यांचा निश्चयपूर्वक प्रयत्न चालू आहे. आशिआंतील बऱ्याचशा देशांवर परवापरवापर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी पाश्चिमात्य देशाची सत्ता असल्यामुळें स्वातंत्र्य ह्याचा अर्थ पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पिळवणुकीपासून मुक्तता, असा त्यांच्या मनावर ठसलेला आहे. गोऱ्या कातडीचा कोठलाहि माणूस असो त्याच्याविषयीं आशिआंतील लोकांना संशय वाटतो. बहुतेक लोकांचा असा ठाम निश्चय झालेला आहे, कीं आपल्या देशांत पुन्हां परकीयांचा अंमल कधींहि बसूं द्यावयाचा नाहीं. नियतकालिकांत असलेल्या निरनिराळ्या लेखांचा संक्षिप्त सारांश वर दिल्याप्रमाणें आहे. आशिआंतील देशांच्या परिस्थितीविषयींचे सत्यकथन म्हणून वरील चित्र यथातथ्यच आहे. भारतामधील अमेरिकेचे वकील मि. चेस्टर बोल्स ह्यांनी अशाच पद्धतीनें भारताची बाजू अमेरिकेला पटवून देण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. आशिआला कम्युनिझमपासून बचाऊ पहाणाऱ्या अमेरिकन नागरिकांना कम्युनिझम म्हणजे काय हें मुदलांतच माहीत नसतें, असें मत मिसेस रूझवेल्ट ह्यांनीं भारतामधील दौऱ्यांत व्यक्त केलें होतें. अमेरिकन नागरिकांना शहाणे करण्याचा हा प्रयत्न स्वागतार्ह आहे.

---

**अमेरिकेची इराणला मदत**— आशिआंतील मागासलेल्या राष्ट्रांना मदत करण्याच्या अमेरिकेच्या योजनेप्रमाणें इराणला १,१०,००,००० डॉलर्सची मदत करण्याचा करार उभयतां देशांत झाला आहे. कराराप्रमाणें सार्वजनिक आरोग्य, शेती आणि शिक्षण ह्या बाबींवर वरील रक्कम खर्च करण्यांत येईल.

## कोयना योजनेबाबत प्रचार व वस्तुस्थिति

( रा. ब. न. स. जोशी, बी. ई. ( सिव्हिल ), एम्. आय. ई. ( इंडिया ), एम. आर. सॅन. आय. ( लंडन ) ह्यांचें पत्र.

श्री. संपादक 'अर्थ' ह्यांस सा. न. वि. वि.

किर्लोस्कर मासिकावरून आपण कोयना जल-वैजिक ( Hydro-Electric ) याजनेसंबंधी माहिती उद्धृत करून ती आपल्या ता. १२ मार्चच्या अंकांत छापली आहे. 'अर्थ' या साप्ताहिकांत येणारे आंकडे ( व माहिती ) वाङ्मयीन मासिकें व प्रचारी पत्रें यांतील आंकड्यांपेक्षा जास्ती जबाबदारीनें दिलेले असतात, असा अनुभव असल्यामुळेंच हें पत्र आपणाकडे धाडीत आहे.

( २ ) जरूर तो पत्रव्यवहार केल्यानंतरच हें पत्र लिहीत आहे, व त्यामुळेंच माहिती " अर्था " मध्यें प्रसिद्ध झाल्यानंतर हें पत्र लिहिण्यास महिना लागला.

( ३ ) ३५ कोटींच्या ज्या योजनेबद्दल सध्या चळवळ सुरू आहे, तींत क्षेत्रपायनाचा ( Irrigation ) अंतर्भाव नाहीं. त्या योजनेंत फक्त वीजनिर्मितीचीच व्यवस्था आहे. असें असतां, उद्धृत केलेल्या कोष्टकांत, ४ लक्ष एकरांना शेतीस पाणी मिळेल असें लिहिलें आहे, तें सर्वस्वीं चूक आहे. मात्र निवळ वीजनिर्मितीला लागणाऱ्या पाण्याच्या सांठ्यापेक्षा थोडा जास्ती सांठा जलाशयांत सांठविण्याची व्यवस्था आकल्पांत केली आहे, एवढेंच. हें जादा पाणी सुमारें ६०,००० एकर क्षेत्रास पुरेल; ४ लक्ष एकरांस नव्हे. इतकें करूनहि हें पाणी पंपानें वर खेंचण्याचा चालू खर्च, तसेंच उत्पायनास ( Lift irrigation ) इतर लागणारी ( खालीं उल्लेखिलेलीं ) स्थापत्यें ( works ) यांची किंमत वरील ३५ कोटींत धरलेली दिसत नाहीं.

( १ ) जलोच्चक ( Pick up weir )

( २ ) चलित्र ( Motor ) व पंप.

( ३ ) पोलादी तोयनी ( Large diameter steel pipes )

( ४ ) कनाल, सीमेन्ट-आस्तरणा ( lining ) सह ( शाखा वगैरे वरून ).

तसेंच, आपण उद्धृत केलेल्या माहितींत विजेचा दर प्रत्येक एकघेया ( Unit ) स अर्धा आणा असा दिला आहे. शंका अशी कीं, हा दर कोणी काढला व ठरविला ? सरकारी खात्यानें हा दर काढला नाहीं असें विचारणा करतां कळतें. शिवाय विजेची किती निर्मिति केली तर " अर्धा आणा एकघेया (Unit) स " हा दर पडेल, याचाहि खुलासा पाहिजे. कारण, मूळ योजनेंत ( ९० कोटी रुपयांची ) उत्पादित होणाऱ्या सर्व विजेस मागणी नसल्यामुळें त्यांतील बऱ्याच मोठ्या भागास खपें असावा म्हणून उत्पायना ( lift irrigation ) चा अंतर्भाव, मूळ योजनेंत केला गेला. उद्देश, पूर्ण उत्पादनास मागणी असली तरच विजेचा दर कमी पडणार व तसा पडावा हा. अशा रीतीनें म्हणजे " उत्पायनास वीज न वापरली तरी " विजेच्या एकघेया ( Unit ) स अर्धा आणा हा दर खालील पैकीं कोणत्या अवस्थे ( Stage ) करितां ?

| अवस्था ( Stage ) | | वीजनिर्मिति. |
|---|---|---|
| प्रथमा | ... | २,४०,००० सहस्रौज (kilowatts) |
| द्वितीया | ... | ४,०८,००० " " |
| तृतीया | ... | ४,९८,००० " " |

वरील पैकीं प्रत्येक अवस्थेस वीजनिर्मितीचा दर काय ? कीं तिन्हीं अवस्थांस एकच दर ? अर्धा आणा अकघेया ( Unit ) च्या ह्या दराबाबत सरकारी आंकडे प्रसिद्ध झालेले नाहींत. किंबहुना, तसे आंकडे अजून तयार केले गेलेच नाहींत, असें चौकशीअन्तीं कळतें. मग हे आंकडे आपण उद्धृत केलेल्या पत्रकांत कोणत्या आधारानें दिले व कोणी काढले, कळत नाहीं ! तसेंच हे दर तरस्थालया ( Power-house ) लगतचे कीं ग्राहकाग्रा- ( Consumers' end ) चे, कीं इतर कोठले याचाही खुलासा होणें जरूर.

आपणाकडे माहिती असल्यास प्रसिद्ध करावी, म्हणजे वाचकांना उपयोगी होईल. तशी माहिती आपणाकडे नसल्यास हें पत्र छापण्यास विनंति आहे.

१२८७, शिवाजीनगर<br>पुणें ५<br>१४-४-१९५२

आपला,<br>नरहर सदाशिव जोशी

( उद्धृत केलेली माहिती किर्लोस्कर मासिकाच्या मार्च, १९५२ च्या संपादकीय मजकुरांतील आहे. त्यांत, " कोयना धरणांतून उत्पन्न होणाऱ्या विजेसाठीं येणारा खर्च—युनिटास अर्धा आणा " असे शब्द आहेत. त्याच संपादकीय मजकुरांत दुसऱ्या ठिकाणीं, " कोयना योजनेंतून जी वीज निर्माण होईल, तिचा उत्पादनखर्च युनिटला अवघा ६ पै पडेल, असें लिहिलेलें आहे. —संपादक, " अर्थ " )


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

**संचालक मंडळ**

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)<br>श्री. न. ग. पवार श्री. मो. रा. जोशी<br>श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. वी. शहा<br>श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. मा. म. गुत्ते

—बँकेच्या शाखा—

मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण ), पुणें ( खडकी व डे. जिमखाना ), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली व उमरावती.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी चिं. वि. जोग<br>लक्ष्मी रोड, पुणें २. मॅनेजर

### जपान २८ एप्रिल रोजीं स्वतंत्र होणार

१८ एप्रिल रोजीं जपानला स्वतंत्र देशाचा दर्जा प्राप्त होणार आहे. गेल्या सप्टेंबरमध्यें सॅनफ्रॅन्सिस्को येथें ४८ राष्ट्रांनीं जपानशीं करावयाच्या तहनाम्यावर सही केली. २८ एप्रिल रोजीं अमेरिकेची सही होईल. लागलीच जपानी चारी बेटांवर जपानची सार्वभौम सत्ता सुरू होईल, ९० दिवसांचे आंत दोस्त राष्ट्रांच्या सेनांचा जपानचा कबजा बंद होईल आणि जपानला इतर देशांत वकिलाती उघडतां येतील. सॅनफ्रॅन्सिस्को तह परिषदेस भारत हजर नव्हता, चीनला बोलावणें नव्हतें व रशियानें प्रस्तुत तह म्हणजे नव्या युद्धाची पूर्वतयारी होय असें त्याविंळीं जाहीर केलें होतें. तहाच्या अटीप्रमाणें, जपानच्या संरक्षणासाठीं अमेरिकन फौजा तेथें रहातील आणि पूर्व आशियांतील सर्व ठिकाणीं शांतता राखण्यासाठीं ह्या फौजांचा उपयोग करूं देण्यास जपान बांधलेला आहे. जपाननें आपल्या जुन्या साम्राज्यावर पाणी सोडावयाचें आहे.

---

### बंगलोरच्या सुप्रसिद्ध गोपाळरावास शिक्षा

बंगलोरचे 'धर्मरत्नाकर' बी. एन. गोपाळराव ह्यांनीं म्हैसूर राज्यांतील कित्येक श्रीमान् लोकांवर व सरकारी अधिकाऱ्यांवर छाप बसवून त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यांचे कोट्यावधि रुपये गोपाळरावांचेकडे ठेव म्हणून आले होते. ह्या ठेवीदारांस गोपाळराव २००% तें ३००% व्याज देऊं करी. आपल्या रेशमाच्या व्यापारांत सुप्रसिद्ध बड्या लोकांची पाती आहे, असें तो दाखवी. १९३३ सालीं त्यांनीं हा धंदा सुरू केला आणि १९४४ मध्यें त्यांचा धंदा फारच तेजींत होता. एका विमा कंपनीच्या एजंटानें, एका व्यापाऱ्यानें व एका सेवानिवृत्त डॉक्टरानें गोपाळरावांचे विरुद्ध अनुक्रमें ८२,००० रु., १,००,००० रु. व १२,००० रु. बाबत फसवणुकीची पोलिसांकडे तक्रार केली, त्यावरून २१ एप्रिल, १९४७ रोजीं गोपाळरावावर खटला भरण्यांत आला, त्याचा निकाल १७ एप्रिल रोजीं लागून त्यास दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा झाली.

---

### रेशमाच्या बाजारांतील मंदीची झळ

रेशमाच्या बाजारांतील मंदीमुळें बंगलोर येथील सुमारें १०० रेशमाचे पॉवरलूम कारखाने बंद पडणार आहेत. त्यांत सुमारें ९०० माग आहेत. ४,००० ते ५,००० रेशमी हातमाग अगोदरच बंद पडले आहेत. सुमारें ५० लक्ष रुपयांचें सूत पॉवरलूम कारखानदारांच्या गुदामांतून पडून आहे. दर वारास २ ते ३ रुपयांनीं किंमत उतरली, तरी रेशमी कापडास मागणी नाहीं. त्यामुळें कारखाने बंद करणें क्रमप्राप्त झालें आहे.

---

### भारतांतील कोणत्याहि विद्यार्थ्यास भेदभाव नको

कांहीं राज्यांतील कॉलेजांत, इतर राज्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून जादा प्रवेश व इतर फी आकारण्यांत येते. असें करणें राज्यघटनेच्या १५ ( १ ) कलमाचे विरुद्ध आहे; तेव्हां येत्या शैक्षणिक वर्षापासून अशी आकारणी बंद करण्यांत यावी, अशी सूचना भारत सरकारनें राज्य सरकारांना केली आहे.

---

### कुन्नर येथील केंद्र हैद्राबादेंत जाणार

कुन्नूर येथील अन्नविषयक संशोधनकेंद्र ( न्युट्रिशन रिसर्च सेंटर ) हैद्राबादकडे हलविण्यांत येणार आहे. त्यासाठीं हैद्राबाद सरकारनें उस्मानिया विद्यापीठाशेजारीं जागा देण्याचें मान्य केलें आहे.


## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

★

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली — चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, — व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

**—मिरज—**

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.  
के. डी. शिराळकर, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.